# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर

## एम.ए. मराठी अभ्यासक्रम

### अभ्यासक्रमाची उद्दिष्टे

१ मराठी भाषा आणि मराठी साहित्य याविषयीचे प्रगत आणि परिपूर्ण ज्ञान विद्यार्थ्याला व्हावे व त्याविषयीची प्रगल्भ जाणीव विकसित व्हावी .

२ मराठी साहित्याच्या परीघातील विविध क्षेत्रात संशोधन करण्याची क्षमता विकसित व्हावी.

३. विद्यार्थ्याला स्वत:च्या अभिरुचीचे संशोधन क्षेत्र निश्चित करता यावे.

४ वाङ् मयविषयक आणि मानवी जीवनविषयक जाणीव प्रगल्भ व विकसित व्हावी.

५ विद्यार्थ्यांमधील लेखनकौशल्याचा पूर्ण विकास होऊन त्यांच्यात संशोधनाची,समीक्षेची, वाङ् मयप्रकारातील प्रत्यक्ष लेखनाची क्षमता व जाणीव निर्माण व्हावी.

६. मराठी साहित्य, भारतीय साहित्य आणि विश्वसाहित्य याविषयीची मूलभूत जाण विकसित होऊन संशोधनाच्या नव्या वाटा शोधण्यास  विद्यार्थ्यांनी स्वत: उद्युक्त व्हायला हवे.

७. उच्च शिक्षणातील आचार्य (पीएच. डी.पदवीसाठी) वा संशोधनकार्यासाठी पूर्ण सिद्धता व्हावी.

८. विविध  वाङ् मयविषयक प्रश्न व सोबतच राष्ट्रीय,सामाजिक व सांस्कृतिक प्रश्न यांच्या परस्परसंबंधांची जाण विकसित होऊन  त्यासंबंधी वाङ् मयक्षेत्रात सकारात्मक कार्य  करण्याची प्रेरणा निर्माण होणे.

९. मराठी भाषा,मराठी साहित्य आणि मराठी संस्कृती यांच्या आंतर्संबंधांची प्रगल्भ जाणीव होऊन त्यांच्या विकासासाठी आणि समृद्धीसाठी कार्य करण्याची प्रेरणा जागृत व्हावी.

१० प्राचीन  ते अर्वाचीन अशा मराठी साहित्याच्या समग्र इतिहासाची व त्यातील प्रवृत्ती-प्रवाहांची प्रगल्भ जाण विकसित होऊन,संबंधित दायित्वबोध होऊन त्याविषयी समाजाला उचित,सम्यक व सकारात्मक मार्गदर्शन करण्याची प्रेरणा निर्माण व्हावी.

### अभ्यासक्रमाची फलश्रुती (Out Comes)

१. अभ्यासक्रमाची उद्दिष्टे साध्य होतील.
२. भारतीय इतिहास व भारतीय संस्कृतीची जाणीव होईल.
३. कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.
४. व्यक्तिमत्वाचा चौफेर विकास होईल.
५. विद्यार्थ्यांकडून दर्जेदार व समाजोपयोगी  संशोधन कार्य घडून येईल.
६. वाङ् मयाच्या अभ्यासामुळे विद्यार्थी वाङ् मय निर्मिती करण्यास प्रवृत्त होईल.
७. आकलन झालेल्या ज्ञानाचे जीवनव्यवहारात उपयोजन करेल.

# SKILL BASE COURSES – FOR M.A. MARATHI

| S. NO. | NAME OF THE COURSE | INFORMATION OF THE COURSE |
|---|---|---|
| 1 | CREATIVE WRITING AND JOURNALISM | NIRANTAR PRAUDH SHIKSHAN AANI VISTAAR VIBHAAG RTMNU NAGPUR |
| 2 | CONVERSATIONAL AND COMMUNICATION SKILL | NIRANTAR PRAUDH SHIKSHAN AANI VISTAAR VIBHAAG RTMNU NAGPUR |
| 3 | DRAMATICS | NIRANTAR PRAUDH SHIKSHAN AANI VISTAAR VIBHAAG RTMNU NAGPUR |
| 4 | E- JOURNALISM | NIRANTAR PRAUDH SHIKSHAN AANI VISTAAR VIBHAAG RTMNU NAGPUR |
| 5 | LANGUAGE COMMUNICATION AND BUSINESS | NIRANTAR PRAUDH SHIKSHAN AANI VISTAAR VIBHAAG RTMNU NAGPUR |
| 6 | TRANSLATION STUDIES | NIRANTAR PRAUDH SHIKSHAN AANI VISTAAR VIBHAAG RTMNU NAGPUR |
| 7 | TEACHING IN MARATHI LANGUAGE FOR NON MARATHIS | NIRANTAR PRAUDH SHIKSHAN AANI VISTAAR VIBHAAG RTMNU NAGPUR |
| 8 | ADVERTISEMENT AND MEDIA | SWAYAM –CEC |
| 9 | BODY LANGUAGE : KEY TO PROFESSIONAL SUCCESS | SWAYAM – NTPEL |
| 10 | GENDER SENSITISATION : SOCIETY CULTURE | SWAYAM – NTPEL |
| 11 | AVAILABILITY AND MANAGEMENT OF GROUND WATER | SWAYAM – NTPEL |
| 12 | UNDERSTANDING DISCIPLINES AND SUBJECTS | SWAYAM – IGNOU |

29/07/2022

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

## एम. ए. मराठी अभ्यासक्रम

# श्रेयांक व श्रेणी पद्धतीवर आधारित पुनर्रचित अभ्यासक्रम

## M.A. MARATHI SYLLABUS (C.B.C.S. PATTERN)

### एम. ए. (मराठी) भाग – १

### सत्र - I

Core 101 : प्राचीन व मध्ययुगीन मराठी साहित्याचा इतिहास

Core 102 : साहित्यशास्त्र

Elective 103 (A) : कादंबरी (विशेष वाङ्मय प्रकार) किंवा

Elective 103 (B) : नाटक (विशेष वाङ्मयप्रकार) किंवा

Elective 103 (C) : कथा (विशेष वाङ्मयप्रकार)

Elective 104 (A) : संत ज्ञानेश्वर (विशेष ग्रंथकार) किंवा

Elective 104 (B) : वि. वा. शिरवाडकर (विशेष ग्रंथकार) किंवा

Elective 104 (C) : यशवंत मनोहर (विशेष ग्रंथकार)

### सत्र - II

Core 201 : आधुनिक मराठी साहित्याचा इतिहास

Core 202 : आधुनिक मराठी कविता

Elective 203 (A) : मराठी निबंध वाङ्मय किंवा

Elective 203 (B) : ललित निबंध किंवा

Elective 203 (C) : वैचारिक मराठी साहित्य

Elective 204 (A) : साहित्यसमीक्षा किंवा

Elective 204 (B) : संशोधनशास्त्र किंवा

Elective 204 (C) : पाश्चात्य साहित्यसिद्धांत